संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नवमतदार समस्यांनी बेजार

**राजकारणी** कोणत्या गोष्टीसाठी कोणाला भरीस घालतील याचा काही नेम नाही. म्हणजेच आपला निवडणुकीचा स्वार्थ साधण्यासाठी किंवा मतांची बेगमी करण्यासाठी काय निमित्त शोधून काढतील हेही सांगता येत नाही. काळाच्या ओघात किंवा वेगवेगळ्या निमित्तांमुळे काही योग सहजपणाने जुळून येतात. पण त्याचादेखील मतांसाठी वापर होऊ शकतो. ही कल्पना राजकारण्यांना बरोबर सुचते. एरवी समाजातले हे असे अनेक घटक आहेत की त्यांचा कधीही त्यांना विचार करावा असे वाटत नाही. या नवमतदारांविषयी बरीच चर्चा ऐकू येत आहे. ज्यांना अठरा वर्षे पूर्ण झाली ते या एकविसाव्या शतकातले पहिल्यांदाच मतदान करणारे मतदार ठरतील. ज्यांचा जन्म सन २००१ साली झाला. त्यांनी २०१८ साली आपल्या वयाची अठरा वर्षे पूर्ण केली. म्हणजेच ते मतदानासाठी पात्र ठरले. देशभरात असे जवळपास वीस कोटीच्यावर नवमतदार आहेत. नव्या शतकातले नवे मतदार असे त्यांचे वर्णन करून त्यांनी मतदान करणे किती गरजेचे आहे. याचा वारंवार भडीमार केला जात आहे. प्रचारासाठी आता या राजकारण्यांना हे मतदार आठवले, परंतु याच तरूण आणि नवमतदारांना अनेक प्रश्न भेडसावत आहेत. त्याचा कधीही कोणीही विचार केला नाही. विशेषतः रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आणि या शतकातल्या या नवमतदारांना सर्वात आधी याच प्रश्नाशी सामना करावा लागतो आहे. शिक्षण, करियर, आरोग्य अशा अनेक आघाड्यांवर त्यांना सतत संघर्ष करावा लागतो. या शतकातले सर्वाधिक महागडे शिक्षण त्यांना घ्यावे लागले. शिक्षण घेण्यासाठी आपले गाव , शहर सोडून त्यांना महानगराकडे धाव घ्यावी लागली. म्हणजेच आयुष्यातला शिक्षणाचा टप्पा पूर्ण करता करताच त्यांची एवढी दमछाक होते की इतके परिश्रम घेतल्यानंतर मनासारखा रोजगार मिळेल की नाही अशी त्यांना भीती वाटत राहाते. सतत चाचपडत राहाणारा हा देशाचा सर्वाधिक तरूण वर्ग सगळ्याच दृष्टीने परावलंबी आहे असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही.

### राजकारण्यांचा स्वार्थ

लोकशाहीव्यवस्थेचा विचार केला तर प्रत्येक मतदार हा महत्वाचा आहेच. स्वाभाविकपणे ज्यांनी वयाची अठरा वर्षे पूर्ण केली आहेत अशांना मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. आणि तो आपला पहिला वहिला हक्क बजावण्यासाठी त्याच्यामध्ये उत्सुकताही असते. आज भारतीय लोकसंख्येचा विचार केला तर एकूण ९० कोटी मतदारांच्या संख्येत जर वीस कोटी हे नवमतदार असतील तर ही संख्यादेखील खूप लक्षणीय ठरते. कारण एकूण लोकसंख्येच्या किमान वीस टक्के हे तरूण मतदार असल्याचे सिध्द होते आणि मग पहिल्यांदाच मतदान करताना त्यांचे योग्य ते प्रबोधन होण्याची गरज वाटू लागते. लोकशाहीची मूल्ये उद्दीष्टे किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या घटनासमितीने जे प्रचंड परिश्रम घेऊन देशाचे संविधान निर्माण केले त्याचे संवर्धन होण्याकरीता काय करण्याची गरज आहे हे या तरूण मतदारांच्या लक्षात आणून दिले गेले पाहिजे. कारण भारताला मिळालेले स्वातंत्र्य किंवा त्यासाठी ज्यांनी प्राणपणाने संघर्ष केला अशा अनेकांनी आपल्या तरूण वयातच देशासाठी त्याग केला होता. त्यावेळी असलेली राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव आजच्या या तरूण पिढीपर्यंत त्याच पध्दतीने सांगितली गेली पाहिजेत. केवळ उत्साहाच्या भरात किंवा तरूण वयामध्ये कोणतीही गोष्ट विचारपूर्वक कशी होईल याचे मार्गदर्शन हेच महत्वाचे ठरते. त्यातही नव्या शतकातला हा अठरा वर्षे पूर्ण करणारा नवमतदार म्हणजे या शतकातला तो खऱ्या अर्थाने तो नवमतदार ठरतो. त्याच्या या मतदानाच्या हक्काला एक ऐतिहासिक महत्त्व आहेच. भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशातला सर्वात मोठ्या संख्येचा नवमतदार निश्चितच महतत्त्वाचा घटक मानावा लागेल. फक्त आपला राजकारणासाठी उपयोग करून घेतला जाणार नाही याची खबरदारी या नवमतदाराने घ्यायला हवी , देशाचे भवितव्य, समाज यासाठी आपले कर्तव्य काय याचा विचार करीत असतानाच स्वतःचे भवितव्य घडवण्यासाठी आताचे राजकारणी काय करू इच्छितात याचाही त्याने जाब विचारला पाहिजे.

### निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष

खरे तर या शतकातल्या या नवमतदाराचे महत्त्व निवडणूक आयोगाने ओळखायला हवे होते. आणि मतदार नोंदणीचे आवाहन करताना या नवमतदारांना आकर्षित करायला हवे होते. कारण या शतकातला त्यांना मतदानाचा पहिला हक्क बजावता येईल हे जर निवडणूक आयोगाने लक्षात आणून दिले असते तर आणखी बऱ्याच नवमतदारांनी मतदार यादीमध्ये आपली नावे नोंदवली असती. सुदैवाने भारताकडेही इतक्या मोठ्या संख्येने ही युवा शक्तीही उपलब्ध आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते. या युवा शक्तीचा विधायक किंवा सकारात्मक कामासाठी विचार न करता तिच्याकडे एक वस्तू किंवा कमोडीटी म्हणून बघितले जाते. युवक हा देशाचा खऱ्या अर्थाने आधार असतो. परंतु तोच युवक आज मोठ्या संख्येने बेरोजगार आहे. हे त्याच लोकशाहीचे मोठे अपयश म्हणावे लागते. राजकीय पक्षांनी केवळ त्याच्या मतांवर डोळा ठेवू नये तर त्याचे हक्क अधिकार आवश्यकता याचाही गांभिर्याने विचार करावा. समाजातला हा शिक्षित, उच्चशिक्षित वर्ग आपल्या आयुष्याची मोलाची अनेक वर्षे नोकरी व्यवसाय मिळवण्यासाठी अक्षरशः वाया घालवत असतो ही वेळ त्याच्यावर येणार नाही शिक्षण संपण्यापूर्वीच त्याचे नोकरीचे, रोजगाराचे किंवा व्यवसायाचे भक्कम आश्वासन त्याला मिळाले पाहिजे. त्याने प्राप्त केलेल्या ज्ञानाचा, शिक्षणाचा त्याच्या उमेदीच्या काळातच देशासाठी आणि समाजासाठी वापर झाला पाहिजे.